थोडक्यात व्यावसायिक नाटकात प्रयोगशीलता असू शकते, असावी आणि प्रायोगिकतेत व्यावसायिकता असणे गरजेचे असते....

गाजलेली काही प्रायोगिक/समांतर

नाटके/लेखक/दिग्दर्शक/कलाकार/ वानगीदाखल – घाशीराम कोतवाल– तेंडूलकर, जब्बार पटेल, डॉ. मोहन आगाशे

महानिर्माण – सतीश आळेकर, चंद्रकांत काळे

लोककथा ७८ – रत्नाकर मतकरी तसेच चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी, अजित दळवी, प्रतीक्षा लोणकर यांनी त्यांच्या 'जिगिषा' ग्रुपतर्फे केलेली नाटके. पुरूषोत्तम बेर्डे यांची प्रायोगिक नाटके. चेतन दातारांची नाटके आणि एक महत्त्वाचे नाव म्हणजे पं.सत्यदेव दुबे.

साधारणपणे ३०,४० वर्षांचा प्रायोगिक/समांतर आणि व्यावसायिक रंगभूमीचा इतिहास पाहिला तर असे दृष्टोत्पत्तीस येते की प्रायोगिक/समांतर रंगभूमीवरून अनेक लेखक, दिग्दर्शक, कलाकार हे अंतिमतः व्यावसायिक रंगभूमीवरच कार्यरत झालेले आहेत. तसेच अशी अनेक प्रायोगिक/समांतर नाटके पण आहेत की जी कालांतराने व्यावसायिक रंगभूमीवर प्रस्थापित झाली. म्हणजे आजचे प्रायोगिक/समांतर नाटक हे उद्याचे व्यावसायिक नाटक असते.

या ठिकाणी मी काही नाट्यलेखकांचा, दिग्दर्शकांचा, कलाकारांचा उल्लेख करते जे मूळात प्रायोगिक/समांतर रंगभूमीवरूनच व्यावसायिक रंगभूमीवर आलेले आहेत. तेंडूलकर, मतकरी, जयंत पवार, शं.ना.नवरे, विजया मेहता, चंद्रकांत कुलकर्णी, वामन केंद्रे, कुमार सोहनी, विजय केंकरे, डॉ. मोहन आगाशे, नाना पाटेकर, मोहन जोशी, दिलीप प्रभावळकर, विनय आपटे, सदाशिव अमरापूरकर, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, रीमा, नीना कुलकर्णी अशी अनेक असंख्य नावे आहेत. पण सगळयांचाच उल्लेख जांगेअभावी अशक्य आहे.

आजची जी नाटककारांची, कलाकारांची, दिग्दर्शकांची नवीन पिढी आहे, त्याबद्दल मला फार कौतुक वाटते. या पिढीमुळेच प्रायोगिक/समांतर, व्यावसायिक हा भेद पुसला जाणार आहे. तसेच नव्या कल्पना, नवे विचार, नव्या पद्धती रंगभूमीवर रूजणार आहेत. जग जवळ येत आहे आणि जगाला सांस्कृतिकदृष्ट्या भारताशी जोडण्यात ही युवा पिढी यशस्वी होणार आहे. वानगीदाखल काही नावे....